# प्रभुतरुण


वर्ष ८९ | अंक ६ | मुंबई | जानेवारी २०१३ | पाने ६ | किंमत रु. १

(*स्थापना* : तारीख २५ ऑगस्ट १९२३)


**तत्त्वाचा बंदा जीव । मूर्तीला कोण विचारी?**


www.prabhutarun.org

*संपादिका:* **सुहासिनी कीर्तिकर** *कार्यकारी संपादक मंडळ* : **मिनाक्षी जयकर, मयुरा नायक, संजना कोठारे, वैजयंती कीर्तिकर**


*संपादकीय*

## स्वागत नवेपणाचे

**—सुहासिनी कीर्तिकर**

नवीन वर्ष सरत्या वर्षाला ‘खो’ देत उजाडले. निसर्गाचा तो धर्मच आहे. कालचक्राची गती अविरत चालूच असते. त्यामुळे दिवस-रात्र, ऋतुमागून ऋतू येतात; जातात. प्रत्येक पळाला, घटकेला, क्षणाला स्वत:चे स्वतंत्रपण असते. चेहरामोहरा असतो. पण ते सगळे अखंडपणे पुढच्याला मागे टाकत पुढेपुढे जातच असतात. नित्य रहाटीनं. नवीनपणानं. कालचा वर्तमान आज भूतकाळ ठरतो. उद्याचा भविष्यकाळ आजच्या वर्तमानाला भूतकाळात जमा करायला टपलेलाच असतो. त्यामुळे दोन हजार बारा संपले, भूतकाळात जमा झाले यात नवल ते काय? विसावे शतक उजाडले तेव्हा किती उलघाल झाली होती! पण म्हणता म्हणता विसाव्या शतकानेही एक तप पार पाडले. त्यातही वेगळे ते काय?

वेगळेपण आहे. खरंच आहे! अहो, मानवजातीनं जी संस्कृती निर्माण केली, जी इतिहासपरंपरा तयार केली; त्याचा लेखाजोखा या काळाच्या मापनानं आकार धरून आहे. माणूस म्हणूनच गेल्या काळाला लक्षात ठेवतो. आढावा घेतो. काळाचेही श्रेय त्याला देतो. जीव जन्माला आला की तो क्षणाक्षणानं वाढतोच. पण या वाढण्याला सांस्कृतिक, सामाजिक उंची, लांबीरुंदी माणसानंच बहाल केली. त्यामुळं कालमापन करणं त्याला आवश्यक ठरलं. म्हणूनच तर विविध समाजाचे, संस्कृतीचे मापनाचे वेगवेगळे दंडक तयार झाले. हिंदूंचा पाडवा, व्यापाऱ्यांची बलिप्रतिपदा, पारशांचा नवरोझ, ख्रिश्चनांचा एक जानेवारी अशी विभागणी होत गेली. गंमत म्हणजे ज्याचे राज्य, ज्याची अधिसत्ता त्याच्या कालमापनाला जगभर मान्यता लाभली. म्हणूनच तर जानेवारी ते डिसेंबर हा एक वर्षांचा एक काल तयार झाला. मग संस्कृतीनं याभोवती भावनिक, सामाजिक वर्तुळं आखली. म्हणून मग कोठल्याही संस्कृतीतला ‘मोरू’ ‘आज एक जानेवारी’ म्हणत नवीन वर्षाचे स्वागत करतो. सरत्या वर्षाला निरोप देतो.

निरोपाच्या निरुपणात आढावा घेतो. नवीन धडे गिरवतो. नवीन विजय मिरवतो; अन् नव्या वर्षाला सामोरा जातो. ‘वीसशे बारा’ अनेक बाबतीत विजय मिरवून गेले. पण... पण खरं सांगू का; सगळा आनंद, सगळा सगळा विजय सध्याच्या भवतालात अगदी कोळपून गेला आहे. म्हंजे, अवतीभवती मनाला काजळी धरणाऱ्या घटना तशा नेहमीच घडत असतात. कुठे खून, मारामारी, कुठे भ्रष्टाचार, अत्याचार... कुठे माद-उन्माद, कुठे अपघात-घातपात नेहमीचाच असतो. सुसंस्कृत मानवाचा चेहरा जरा खरवडला की हे सारे अगदी अपरिहार्यच असते जसे! सत्तेसाठी पिपासा, अधिकारासाठी राजकारण, श्रेष्ठत्वासाठी जातीयता, स्वार्थासाठी श्रीमंतीची हाव असं सगळं चालूच असतं. वानराचा नर झाला तरी त्याचं वानरत्व असं सिद्ध होतच असतं. पण जसजसा काळ मागं जातो, तसतसा माणूस माणूसपणाच्या बाबतीत तरी पुढं जायला हवा ना? वानराचा नर झाला; आता नराचा नारायण बनण्यासाठी त्यानं काळ मागं टाकत पावलं पुढं अन् पुढपुढंच टाकायला हवीत ना? पण वीसशे बारा सरता सरता वास्तव फारच राक्षसीवृत्तीनं सामोरं आलं अन् ‘काय झालास तू?’ असं माणसानं माणसाला विचारायची, अंतर्मुख होऊन पहायची पाळी आली. बारा साल सरता सरता सगळं वर्तमान मनावर आदळत राहिलं. भर दिवसा, भर वस्तीत सामूहिक बलात्कार, वडील-भाऊ-मुलगा अशी नाती झुगारत केवळ नरमादी बंध चिवटपणे स्वत:च्या मुलीवर, बहिणीवर, आईवर बलात्कार करू लागले. प्रगतीकडे जाता जाता ही कुठल्या प्रकारची


(पान २ कॉलम १ वर)


*विस्तारीत संपादकीय*

## पाठारे प्रभु आयडलचा शोध

**-संजना दीपक कोठारे**

नवीनभाई ठक्कर सभागृह हे माझ्यासाठी नवीन असले तरी रंगभूमी म्हटल्यावर एक वेगळीच ऊर्जा अंगात येते. आम्ही पोहोचताच प्रकाशयोजना आणि सेटची तयारी चालू होती. दोन महिन्यांच्या धमालची मस्ती आणि आयोजकांच्या अथांग परिश्रमानंतर हा दिवस शेवटी उजाडला. दोन महिने कसे गेले कळलेच नाही. ‘वलय प्रतिष्ठान’च्या या दुसऱ्या कार्यक्रमात सहभागी होण्याची संधी आणि त्या बरोबरीने पाच सुरेल गायकांना ऐकण्याचा योग मला लाभला होता. पाठारे प्रभुंना व्यावसायिक अनुभव मिळावा यासाठी पूजा आणि अमर अजिंक्य यांनी त्यांच्या पहिल्या नाट्य प्रयोगातून आपल्या ज्ञातीयांच्या अभिनयशैलीला वाव दिलाच होता. आता गायकांना संधी देणारा त्यांचा दुसरा आविष्कार म्हणजे आपल्या ‘पाठारे प्रभु’ गायक गायिकांना व्यावसायिक पातळीवर प्रेक्षकांसमोर आणण्याचे त्यांचे उद्दिष्ट जे पूर्णपणे यशस्वी ठरले. त्यांनी आयोजिलेला ‘पाठारे प्रभु आयडल’. हा कार्यक्रम १७ नोव्हेंबर २०१२ रोजी मोठ्या दिमाखाने पार पडला.

मला हे जाहीर करायला अभिमान वाटतो की पूजा आणि अमर अजिंक्य आपल्या ज्ञातीतले एकमेव जोडपे आहे जे स्वत: व्यावसायिक पातळीवर रंगभूमीशी संबंध असताना आपल्या ज्ञातीच्या व्यावसायिक हौशी कलाकारांना वाव देत आहेत. अतिशय व्यावसायिक आणि प्रामाणिकपणे जरी तालमी घेतल्या गेल्या तरी एक आनंदमय आणि तणावमुक्त वातावरण असायचे. गायकांच्या आदरातिथ्याची जबाबदारी प्रीती धैर्यवान यांच्या अतिथ्याने बखुबी निभावली. अगदी घरगुती वातावरणात तालमीला जरी धमाल मस्ती असायची तरी त्या तालमी पूर्णत: व्यावसायिक पातळीवर घेतल्या गेल्या होत्या. व्यावसायिक तबला वादक आणि पेटीवादक साथीला सज्ज होते. आपल्या मौल्यवान सल्ल्यांनी ते गायकाला योग्य मार्गदर्शन करत असत.

१७ नोव्हेंबर २०१२ ला पाठारे प्रभु आयडलचा शोध होणार होता. राजन प्रधान, रोनिका विजयकर, डॉ. क्षितीज कीर्तिकर, सागर राणे देवरुखकर आणि रोहन प्रधान हे पाच अतिशय योग्य आणि प्रतिभावान अंतिम स्पर्धक होते. अतिशय व्यावसायिकरित्या हाताळलेल्या कार्यक्रमाला कुठलीच कमी नव्हती. प्रत्येक स्पर्धकाला आपली आवडती पाच गाणी तयार करायची होती. भक्तीगीत, भावगीत, जलदगीत, लोकगीत आणि शास्त्रीय संगीतावर आधारित गाण्याची तयारी या पाच स्पर्धकांना करायची होती. त्या पाच गाण्यांपैकी प्रत्येक स्पर्धकांनी तीन चिठ्ठ्या उचलून आपापल्या गाण्यांची निवड केली. आयोजकांनी गायकांच्या प्रत्येक गाण्यासाठी त्याला योग्य तो पोशाख दिला होता. त्यामुळे त्यांच्या गाण्याला अजूनही खरेपणा आणता आला.

तिसरी घंटा झाली आणि पडद्यामागे रंगभूमीची पूजा आटपून सर्वजण रंगदेवतेचा, वाद्यवृंदाचा आणि वडीलधाऱ्यांचा आशीर्वाद घेत होते. मनात तीच खळबळ आणि उत्सुकता. कार्यक्रमाची सुरुवात पूजा अजिंक्यच्या सुंदर आणि दमदार आवाजात ईशस्तवनाने झाली. त्यानंतर एकूण १० कलाकारांनी परभी पोशाखात ‘गौरव गीत ’ गायले आणि एक एक करून स्वत:ला त्या संगीताच्या गौरवाचा भाग बनवत आपल्या कलाकृतीतून मायमराठीचा बाणा जपत गेले. रंगतदार अशा गौरवगीतानंतर अतिशय भावपूर्ण संचालन करीत पूजा अजिंक्य यांनी आपल्या ज्ञातीच्या अशा कलावंतांना मानाचा मुजरा करून सन्मानित केले ज्यांनी संगीताच्या क्षेत्रात आपला ठसा उमटवलेला होता. या उमद्या व्यक्तीमत्वाच्या योगदानाची काही क्षणचित्रे आणि मुलाखत पडद्यावर दाखविण्यात आली. अशा काही व्यक्तींना मानचिन्ह देऊन


(पान २ कॉलम ३ वर)

(पान१ कॉलम २ वरून)

अधोगती? कुठल्या सुसंस्कृत माणूसपणाचे हे कोसळणे? ही कुठली आली वखवख? एका हिस्त्र क्षणी बंदूकीच्या गोळ्या चालवून कोवळ्या शाळकरी मुलांना संपवून टाकणारी ही कुठली आली 'शाळा'?

असं वाटतं की आता खरोखरच संस्कृतीची, माणुसकीची 'शाळा घ्यायची' घटका आलीय. ती वेळीच नाही घेतली तर नरश्रेष्ठ असणारा माणूस नराधम बनतच जाणार. उतारावर बैलगाडी उभी करायची तर त्याला टेकू लावावा लागतो. तो काढला वा निसटला तर गाडी घसरणीला लागते, खोल खोल घसरतच जाते. विवेकाचा टेकू लावायची आता खरंच वेळ आलीय. नाहीतर जगबुडी व्हायची तेव्हा होवो; 'माणूस' बुडायला वेळ लागणार नाही. बारा सालानं आपल्या घडामोडीतून शिकवलेला हा धडा तेरा सालात आपण नीट वाचला पाहिजे. नाहीतर आणखी 'तीनतेरा' वाजायला वेळ लागणार नाही! तेरा सालाचं या विचारांच्या उमेदीनं आपण स्वागत करूया. केवळ जल्लोष, केवळ आनंदाचे फवारे, हास्यकल्लोळ करून सरत्या वर्षाला निरोप नाही द्यायचा. त्याच्या हातात हात देऊन त्याला दिलासा द्यायचा की 'बाबा रे, तुला आमच्या अमानुषतेने करकचून आवळलं होतं आम्ही. आता आम्ही विवेकाची कास धरू. जा. शांतीनं जा. निर्धास्त होऊन जा. तेरा सालात आम्ही सगळे तुझी आठवण जागवत पुन्हा 'माणूस' म्हणून जगू. अवघे सुपंथ धरू. स्त्रीपुरुष कुणीही असो; त्याला आत्मसन्मानाने जगायला वाव देऊ. सुसंस्कृत जग निर्माण करू. बारा सालातील अमानुषतेच्या राखेतून फिनीक्स पक्ष्याच्या वृत्तीने पुन्हा नवा जन्म घेऊ. तेरा सालाची मोहर आमच्या सहानुभावी वागण्यावर उमटवू. अलविदा बारा साला!'

'अलविदा' म्हणता म्हणता बारा सालाच्या सरत्या काळात आणखी तप्त मुद्रा उमटली. अमानुषतेची आठवण झाली. ती आहे 'मिस्टेकन आयडेंटिटी'ची. स्कार्फ घालून तोंड झाकलेली तरुणी समोरून चाललेली. खुनी माणसाला वाटले; 'अरे! ही माझीच बायको!' केला तिचा भर रस्त्यात खून. चुकून अनोळखी माणसालाच आपलं समजणे घडते अनेकवेळा. कधी मूल गर्दीत आई समजून भलत्याच बाईचा हात धरते; कधी गर्दीतच हरवलेली बायको सापडल्याचा आनंद साजरा करताना चुकून (चुकूनच बरं का!) भलतीचाच हात धरला जातो. पण बारा सालात बायको समजून भलतीचाच खून करण्यापर्यंत ही 'आयडेंटिटी' मानवाची वेगळी 'आयडेंटिटी' दाखवून गेली. टाळूया तेही.

हो! या 'आयडेंटिटी' वरून आठवण झाली. या जानेवारीपासून वृत्तपत्रीय कायद्याच्या गरजेतून 'प्रभुतरुणा'नेही काही बदल स्वीकारले आहेत. मात्र प्रभुतरुणाचे चाहते, वाचक नवीन प्रभुतरुण स्वरूप स्वीकारताना अजिबात 'आयडेंटिटी' 'मिस्टेकन' घेणार नाहीत; याची खात्री आहे. दरवर्षीच्या प्रथेप्रमाणे जानेवारीपासून प्रभुतरुणात दोन नवीन सदरे येत आहेत. 'युवामंच' मध्येही नवीन लेखक आणि त्यांचे नाविण्यपूर्ण लेख येणार आहेत. 'हसरी रेखा' अर्थ रेखीव करत असणारच आहे. नव वर्षाचे स्वागत करताना प्रभुतरुणाच्या नवेपणाचे आणि ताजेपणाचेही टवटवीत होऊन मित्रहो, स्वागत तुम्ही करालच.

तुम्हा सर्वांना नववर्षाच्या हार्दिक शुभेच्छा!

(पान१ कॉलम ४ वरून)

सन्मानित केले गेले.

त्यापुढे सुरू झाली एकसे एक बहारदार गाण्यांची मेहफिल जी आपल्या पाच स्पर्धकांनी बखुबी निभावली. मध्यांतरानंतर 'कोरस' गायकांनी एक 'मेलडी' हादर केली. आयोजकांनी आणि वादक मंडळीनीसुद्धा या गाण्याचा अनुभव नसलेल्या हौशी कलावंतांना अतिशय सुंदररित्या सांभाळून घेतले आणि योग्य प्रोत्साहन देऊन सहकार्य दिले. या कोरसमध्ये करिष्मा कीर्तिकर, मिथिल नवलकर, सौरभ प्रधान, मिहिका नवलकर आणि संजना कोठारे म्हणजे अर्थात माझा समावेश होता. सूर भटकले तरी पूजा आणि तिच्या वादक मित्रांकडून प्रचंड प्रोत्साहन मिळाले आणि सूर जरी भलतीकडे गेले तरी एक गंमत म्हणून, एक वेगळा अनुभव म्हणून या कार्यक्रमात सहभागी होण्याचा योग आला.

पाच अंतिम स्पर्धकांच्या दमदार आणि सुरेल गाण्यानंतर वेळ होती नकलांची. सुप्रसिद्ध संगीत दिग्दर्शक कमलेश भडकमकर आणि सुप्रसिद्ध गायिका अपूर्वा गज्जला या दोघांनी सामन्यांचे परीक्षण केले. देवेंद्र पेमसारखे दिग्दर्शक, विजय पाटकरसारखे कलावंत यांनी कार्यक्रमाला येऊन शोभा वाढविली. श्रेयस तळपदे जरी आता बॉलीवूड सुप्रसिद्ध नायक असला तरी पाठारे प्रभुंसाठी तो आपला श्रेयस आहे. त्यामुळे त्यांनी आपल्या कार्यक्रमाला हजेरी लावली याबद्दल वेगळी नोंद घ्यायला नको. परंतु एक अभिमान वाटतो की आपल्या अतिशय व्यस्त आयुष्यातून वेळ काढून त्यांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून आपण पाठारे प्रभु असल्याचा अभिमान व्यक्त केला आणि हा घरचाच कार्यक्रम म्हणून त्यांनी आपल्या सहकलाकारांचे स्वागत केले.

अंतिम निर्णय परीक्षकांनी जाहीर करण्यापूर्वी श्रोत्यांची पसंती त्यांच्या मतांनी मोजली गेली. त्यात लोकप्रिय ठरली रोनिका विजयकर आणि ३ मतांनी दुसरा क्रमांक पटकाविला डॉ. क्षितीश कीर्तिकर यांनी. रोनिका विजयकर हिला वलय प्रतिष्ठानकडून महाबळेश्वर येथील एका हॉटेलचे गिफ्ट व्हाउचर मिळाले. परंतु अंतिम निर्णय होता आपल्या परीक्षकांच्या हातात. ज्यांनी निरनिराळ्या स्वरूपाने योग्य गायक निवडला. परीक्षकांच्या निर्णयाने पाठारे प्रभु आयडल बनले 'राजन प्रधान'. दुसऱ्या क्रमांकावर आली रोनिका विजयकर आणि तिसऱ्या क्रमांकावर रोहन प्रधान आला; ज्याला आपल्या वडिलांनीच पहिल्या क्रमांकासाठी मात दिली. राजन प्रधान यांना मानचिन्हासोबत सात हजार रुपये रोख देण्यात आले. त्याचबरोबर रोनिका विजयकर आणि रोहन प्रधान यांना मानचिन्ह आणि अनुक्रमे पाच हजार आणि तीन हजार रुपये देण्यात आले. डॉ. क्षितीज कीर्तिकर हे चौथ्या क्रमांकावर आणि सागर राणे देवरुखकर हे पाचव्या क्रमांकावर आले. त्यांनासुद्धा मानचिन्हे आणि एक हजार रुपये देऊन सन्मानित करण्यात आले. ही मानचिन्हे श्री. हर्षल धराधर यांनी पुरस्कृत केली होती.

पूजाचे संगीतावरचे प्रेम क्षणाक्षणाला आढळून येत होते आणि संगीतासाठी केलेल्या त्या धडपडीला साथ लाभली होती स्वतः अमर अजिंक्य यांची, ज्यांनी उत्तमरीत्या या कार्यक्रमाला हातभार लावला आणि प्रकाशयोजना व सेट या दोन्ही गोष्टी सुंदररित्या सांभाळल्या. पूजाला भक्कम साथ मिळाली ती तिच्या स्वत:च्या मुलीची, ऐश्वर्याची आणि त्याचबरोबरीने भारती विजयकर आणि रजनी कोठारे. ज्यांनी दर तालमीच्या दिवशी सुंदर आणि चवदार भोजन आयोजित केले होते. स्वाती राणे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि या पूर्ण संचाच्या मेहनतीने वलय प्रतिष्ठान अजूनही उंच पायरी गाठेल यात शंका नाही. पूजा आणि अमर अजिंक्यला त्यांच्या पुढच्या वाटचालीसाठी प्रभुतरुणाच्या हार्दिक शुभेच्छा.

## पाठारे प्रभु चॅरिटीज

या संस्थेचा 'निश्चयाचा महामेरू' आता गगनावेरी पोहोचलाय. रविवार, दिनांक ९ डिसेंबर, २०१२ रोजी झालेल्या 'शारदेच्या दरबारातील विद्याभूषण मानकऱ्यां'च्या सत्कार समारंभात याचा पुन:प्रत्यय आला. जी. ए. कुळकर्णींची जागा कमी पडतेय, आता शिवाजी पार्कसारख्या खुल्या मैदानातच हा सोहळा व्हावा असे दरवर्षी या अंकातून मी मांडते. सौ. अनारकली वेलकर या निवेदिकेने ते समारंभातच जाहीरपणे म्हटले; याला अर्थ आहे. मानकऱ्यांची वाढती संख्या, अलोट रसिकप्रेमी यांना जागा अपुरी पडतेय. तरीही नेहमीच्याच दिमाखाने, शिस्तीने, औचित्याने हा सोहळा मानकऱ्यांच्या मिरवणुकीपासून पसायदानापर्यंत पार पडला. निवेदन अनारकलीच्या जोडीने सौ. मेधा वाझकर यांनी केले. प्रमुख पाहुणे होते श्री. सुनील सुधाकर कोठारे. त्यांनी स्वत:चा आत्मपट उलगडत आठवणींना उजाळा देत विद्यार्थ्यांसमोर आदर्श चित्र उभे केले. सौ. गुरप्रीत सुनील कोठारे यांच्या हस्ते पारितोषिक वितरण सोहळा झाला. आभार ॲड. संदीप वेलकर यांनी; तर देणगीवाचन श्री. जगदीश कीर्तिकर यांनी केले. अध्यक्ष श्री. उदय मानकर यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला. श्रीमती नलिनी तळपदे यांच्या सार्थ शब्दांना सुरेल साज लाभला तो सौ. आसावरी सुशील धुरंधर, सौ. रोनिका सचिन विजयकर आणि सौ. जया जैन यांच्या स्वरांचा. त्यांनी शेवटी 'कोकिळे' वर गीतमाला सादर केली. ती कोकिळकंठामुळे आठवणीत राहिली. तीन लाखांवर देणगी रक्कम अवघ्या त्या एका दिवशी चॅरिटीजला त्यांच्या विश्वासार्हतेमुळे मिळाली. त्याचे हे 'लाखमोलाचे' कार्य असेच पुढे जात रहावे. स्मरणिका हा या दिवशीचा आणखी एक स्मरणात राहणारा विशेष. त्यावर तर वेगळा लेख लिहायला हवाय. संस्थेचे अभिनंदन.

## चॅरिटीजचे वैद्यकीय चिकित्सा शिबीर

रविवार दिनांक १० फेब्रुवारी २०१२ रोजी सकाळी ९.३० ते १.३० या वेळात सुरेश विठ्ठल हॉल, ठाकूरद्वार येथे मोफत वैद्यकीय सेवा उपलब्ध करण्यात आली आहे. रक्तगट, रक्तातील साखरेचे प्रमाण, हाडातील कॅल्शियम, कर्करोग आदींची तपासणी आणि कार्डियोग्राम काढणे इत्यादी मोफत सेवा असेल. गरजूंनी याचा लाभ घेण्याचे आवाहन चॅरिटीजचे अध्यक्ष श्री. उदय मानकर यांनी केले आहे.

## पत्रप्रतिक्रिया

दिनांक २८ नोव्हेंबर, २०१२
सुहासिनी कीर्तिकर,
संपादिका, प्रभु तरुण
नमस्कार,

नुकत्याच प्रकाशित झालेल्या प्रभु तरुण दिवाळी अंकामध्ये माझ्या वडिलांनी (कै. श्रीपाद शामराव जयकर) १९४७ मध्ये काढलेले त्रिमूर्ती हे तैलचित्र (आकार ३’ ˝ ४’) जे विलेपार्ले येथील लोकमान्य सेवा संघ या संस्थेमध्ये गेली ६५ वर्षे विराजमान झालेले आहे ते छापून आपल्या ज्ञाती बांधवास माहिती करून दिल्याबद्दल आपणांस धन्यवाद देत आहे. या तैलचित्राविषयी कै. पु. ल. देशपांडे यांनी ही त्रिमूर्ती आम्हां पार्लेकरांची स्फूर्तीदेवता आहे असा उल्लेख त्यांच्या 'गणगोत' या पुस्तकामध्ये केला असल्यामुळे या तैलचित्राला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या तैलचित्राचा फोटो पत्रासहित आपल्याकडे श्री. प्रविण धैर्यवान यांनी पाठविला होता, त्यांचेदेखील आभार मानतो. आपले व आपल्या संपूर्ण टीमचे आभार आणि पुढील अंकासाठी शुभेच्छा!

कळावे,
धन्यवाद.

आपला नम्र,
किशोर श्री. जयकर

लेखांक-१

## फुलता नलिनी दल

# मन वढाय वढाय

— नलिनी तळपदे

*(नलिनीताई तळपदे या सिद्धहस्त लेखिका आणि रसिक जाणकार वाचक. त्यांच्या लेखनाचे आपणही सारे लोभावलेले वाचक आहोत. आपल्या वाचनानंदात भर घालणारी ही लेखमाला वाचून या 'नलिनी दला'त आपण नक्कीच गुंतत जाऊ. नलिनीताईंचे नाव सुचविणाऱ्या श्री. अजित विजयकरांचे आभार मानू.* -संपादक)

'नको नको मना गुंतू मायाजाली' असं मनाला कितीही समजावलं तरी ते बहिणाबाईंच्या शब्दांत 'वढाय वढाय' असतंच. पुन्हा मन एक थोडंच असतं. त्याच्या जोडीला अंतर्मनही असतंच. एरवी या दोन मनांत काही मतभेद असले तरी आपल्याला मायाजाळात गुंतवण्याच्या बाबतीत मात्र त्यांचं एकमत असतं.

आता माझंच पाहा ना- आयुष्यात इतके पावसाळे पाहिले, त्यातच सहस्त्र दर्शनही झालं. आता आयुष्याला 'जय महाराष्ट्र' म्हणायला काय हरकत आहे? खरंतर ही सांजवेळही सरत आली, तरीपण परतीच्या प्रवासाला जाण्याची मनाची तयारी होत नाही.

खरं तर ही सांजवेळ म्हणजे मनावर उदासीनतेचं मळभ आणणारी कातरवेळ असते. पण आमच्या वढाय मनानं आमच्या कानात सांगितलं की ती रमणीय असू शकते. पहा ना चिवचिव करीत तुझ्या अवतीभवती नाचणाऱ्या या दोन चिमण्या. झालं- मायाजाळात गुंतून पडायला आम्हाला तेवढंच निमित्त मिळालं.

मन कितीही व्याकूळ झालं तरी जाणाऱ्याबरोबर आपण जाऊ शकत नाही. पण येणाऱ्याच्या वाटेवर उत्साहाचा सडा शिंपायला काय हरकत आहे? आनंदाची फुलं उधळून त्याचा मार्ग सुगंधित करणं आपलं कर्तव्य नाही का? आणि तसंही जोपर्यंत आपल्या जगण्याचं कुणाला ओझं वाटत नाही, आपल्यालाही ते सुसह्य, सुकर वाटतं तोपर्यंत या मायाजाळात मनाला खुशाल गुंतू द्यावं. शारीरिक व्याधीउपाधींसह स्वीकारलेलं माझं हे जीवनविषयक तत्त्वज्ञान आहे. अर्थात हे माझं मत. आता देवाच्या मनात काय आहे ते त्यालाच माहीत- आयुष्यभर देवधर्म न पाळणाऱ्यालाही शेवटी देवाझेला शरण जावंच लागतं. मग आमचं काय?... असो-

कुणी याला जगण्याची हौस किंवा आसक्ती म्हणेल, पण माझ्या आयुष्याचं हे महावस्त्र अनेक धाग्यांनी विणलेलं आहे. त्या प्रत्येक धाग्याचं मोल माझ्या लेखी अनमोल आहे. यातील प्रत्येक धागा कधी ना कधी 'तू एकटी नाहीस हं' असं म्हणत मला जगण्याची उभारी देत आला आहे. सदैव माणसांच्या गराड्यात असल्यामुळे एकटेपणा जाणवला नाही. उलट आत्या, मावशी, आजी या नात्यांनी वेळोवेळी माझी विचारपूस करणारा माझा गोतावळा, माझ्या वाढदिवसाला आवर्जून फोन करणाऱ्या या सर्वांच्या मी अजून आठवणीत आहे याचंच मला अप्रूप वाटतं आणि पुन्हा मन वढाय वढाय होतं.

अलीकडे ज्येष्ठांच्या समस्या ऐरणीवर आल्या आहेत. त्यातच एकट्या दुकट्या वृद्धांच्या होणाऱ्या हत्या, खाकी वर्दीकडून त्यांना मिळणारा मदतीचा हात-एकूणच एकेकाळी कुटुंबाचा आधारस्तंभ असणाऱ्या ज्येष्ठांची लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाकडून विशेष दखल घेतली जाते.

सुदैवाने ज्या घरात, ज्या कुटुंबात मी रहाते तिथे हा प्रश्न उद्भवला नाही, उद्भवणारही नाही. आपल्या अपेक्षांचं ओझं दुसऱ्यावर न लादता, मानसन्मानाचा दुराग्रह न धरता, अपमान होणार नाही याची खबरदारी घेतली की सगळं सोप्पं होऊन जातं.

तसंही आजपर्यंत माझ्या घरी, माझ्या माणसांनी मला काही कमी पडू न देता अप्रत्यक्षपणे माझं आयुष्य वाढवायला मदत केली आहे.

ही अगदी रक्ताची नाती.

पण ज्यांचा आजपर्यंत काही संबंध नव्हता, त्यांना वाटणारी आपुलकी आणि जिव्हाळा या कुठल्या ऋणानुबंधाच्या गाठी?

दहा वर्षांपूर्वी अजित विजयकरांनी चॅरिटीजच्या बक्षीससमारंभासाठी गाणी लिहिण्याची विनंती केली ती मान्य करून मी गाणी लिहिली एवढंच. त्यावेळी त्यांनी ओंजळ भरून उधळलेली स्तुतीसुमनं आजही तशीच ताजी टवटवीत आहेत. खरंच कुठल्या ऋणाचे बंध असतील हे?

आणि आमच्या सुहासिनीताई, मातृपदावरून 'आजी' या वरची श्रेणी प्राप्त झालेल्या 'प्रभुतरुण' मासिकाच्या विद्यमान संपादिका. त्यांच्याशीही माझं नातं अशाच प्रसंगांनी जुळलं. त्यांची नात अदिती (जी माझी पणती लागते) एक वर्षाची झाल्यावर मी एक छोटंसं गाणं लिहिलं होतं. पण सुहासिनीताईंनी त्याचं मोठ्ठं कौतुक करून ते प्रभुतरुणात छापलं होतं. त्यांनी माझ्यावर टाकलेल्या विश्वासानं मी भारावून गेले. त्यांनी या लेखमालेला दिलेल्या 'फुलता नलिनी दल' या शीर्षकाच्या चक्क प्रेमात पडून मी ही लेखमाला लिहायला तर घेतली. आता पसंत पडणं न पडणं ही तो 'श्री' श्रीमतीची इच्छा!

तसंच सर्वश्री प्रमोद नवलकर, सुहास कोठारे, विहंग नायक, अजित प्रमोद तळपदे, महिला समाजातील माझ्या सख्या, नावं तरी कुणाकुणाची घेऊ- या सर्वांनी वेळोवेळी मला उत्तेजन देऊन आपल्या समाजापुरतं का होईना; प्रसिद्धीच्या झोतात आणण्याचा प्रयत्न केला.

एवढ्या दीर्घायुष्यात बाहेरच्या जगाशी विशेष संपर्क आला नसला तरी अनुभवातून एवढं शिकता आलं आहे की मन वढाय वढाय होतं ते काळ्या ढगाला असणाऱ्या अशा सोनेरी कडांनीच.

चौदा विद्या, चौसष्ठ कलेचा अधिपती असलेला तो गणनायक आमच्यावर कधीच प्रसन्न झाला नाही. शारदेचं कृपाछत्र लाभलं नाही. त्यामुळं विद्या, कला, क्रीडा यापैकी एकाही क्षेत्रात माझा झोका उंच गेला नाही.

तरीपण- तरीपण जमिनीवर पाय टेकवून झुल्यावर हलकेच झुलण्याचा आनंद मी अनुभवला आहे. दुसऱ्यांच्या गुणांचा आदर आणि कदर करणाऱ्या आपल्या पाठारे प्रभु ज्ञातीकडून हे समाधान मला मिळालं आहे.

माझ्या 'शब्द देवाजींचे देणे" या काव्यसंग्रहाच्या प्रती ज्ञातीबांधवांना पाठविल्यावर फोन आणि पत्राद्वारे त्यांनी दिलेल्या पोच, प्रतिक्रियांनी मी भारावून गेलेच; पण त्यापेक्षाही 'प्रभुतरुण', 'प्रभुप्रभात', या मासिकात सुहासिनीताई व स्वाती राणे यांनी त्या काव्यसंग्रहाचं 'प्रत्यक्षाहुनी प्रतिमा उत्कट' असं केलेलं परीक्षण वाचून मनानं अगदी निर्धारच केला इहलोकी प्रस्थान मांडण्याचा. हो; स्वर्गात- थोडंच होणार आहे असं कौतुक?

खरंच अशा दिलदार, कदरदान जातीत जन्माला घातल्याबद्दल त्या अनन्यकोटी ब्रह्मांडनायकाचे आभार मानल्यावाचून रहावत नाही.

असं म्हणतात, लक्ष चौऱ्याऐंशी योनीतून मनुष्याचा जन्म एकदाच मिळतो. तोही अशा सदाबहार जातीत. जिथे दुसऱ्याच्या गुणांची आवर्जून दखल घेतली जाते.

मला या मोहजाळात गुंतून रहायला, ते वढाय वढाय व्हायला अशीच निमित्त शोधत असतं ना-

आताही- सुहासिनीताईंनी प्रभुतरुणासाठी लेखमाला लिहायला सांगितली. मी 'हो' म्हटलं. शब्द दिल्यावर तो पाळण्याची जबाबदारीही आलीच. त्यांत घरात एकामागून एक येणाऱ्या अडचणी. पहिला लेखच वेळेवर लिहून होतो की नाही ही विवंचना. तो कसाबसा लिहीला आणि सुहासिनीताईंना फोन करून एकंदर परिस्थितीची कल्पना दिली. त्यावर त्या जे बोलल्या ते आश्वासक शब्द, त्या शब्दातला जिव्हाळा मनाला स्पर्शून गेला.

अशा लेखकांना समजून घेणाऱ्या उमद्या संपादिकेच्या शब्दाखातर लेखमाला लिहिण्याच्या मोहजाळात मन गुंतून रहाणं स्वाभाविकच नाही का?

नाहीतरी मन निमित्त शोधत असतंच 'वढाय वढाय' व्हायला.!

---

**हसरी रेखा** -प्रदीप कोठारे



# युवामंच

## आजी

-पूजा अमर अजिंक्य

काही माणसं तुमच्या सहवासात काही तासांपुरतीच येतात, काही थोड्या दिवसांसाठी, तर काही वर्षांपुरतीच! पण ती आपल्या मनावर कायमचा ठसा उमटवतात. आपल्या स्मरणात निरंतर राहतात. कायमची!

त्यापैकी एक माझ्या आजेसासूबाई! श्रीमती रतन विनायक अजिंक्य. माझं लग्न झालं १९९३ मध्ये आणि आमच्या आजी गेल्या १९९६ मध्ये. या तीन वर्षांच्या काळात आजींचा सहवास मला पुरेपूर लाभला. त्या गेल्या तेव्हा ८४ वर्षांच्या होत्या. परंतु त्या वयातही स्वयंपाकात काही मोजके पदार्थ करणे, सणासुदीचे पक्वान्न करणे, रोजची स्वतःची नऊवारी धुणे, ती धुतलेली साडी इस्त्री केल्यासारखी नीट घडी करून ठेवणे, इतकेच नव्हे तर बँकेची कामे स्वतः - दोम जिने उतरून, शिवाजी पार्क येथील एल. जे. रोड क्रॉस करून- करणे ही कामे आजी लीलया पेलत होत्या.

२०१३च्या १४ जानेवारीला आजींना १०० वर्षे पूर्ण होताहेत. या निमित्ताने पूर्वस्मृतींना उजाळा देत या हरहुन्नरी व्यक्तिमत्वाचा घेतलेला हा आढावा!

१९१३ला कृष्णराव तळपदेंच्या घरात जन्मलेले हे कन्यारत्न 'रतन'. तळपदेंचं कुटुंब हे बोरीवलीला राहणारे. रतन ही नावाप्रमाणेच रत्नासारखी तेजस्वी! गोरगरीबां-विषयी अतिशय कळवळा. बोरीवलीच्या घरातल्या माळ्याला साप चावल्यावर रतनने झाडपाल्याच्या मदतीने त्याला बरे केले होते.

परिस्थितीने बेजार झालेली, मुळूमुळू रडणारी अशी रतन कुणीच कधीही पाहिली नव्हती. शाळेत असताना एका विषयासाठी दुसऱ्या वर्गात जावे लागे. त्या वर्गातल्या मुली हिच्या वर्गातील मुलींना बसण्यासाठी जागा देत नसत. तेव्हा रडत-बिडत न बसता रतनने आपल्या वर्गातील बाक उचलून त्या वर्गात शिरकाव केला. बाईंनी विचारले असता सर्व प्रकार सांगितला. बाईंचा दम मिळाल्यावर रतनला मानाने वर्गात स्थान मिळू लागले हे सांगावयास नको.

ही बेधडक वृत्ती, आजींना पतीच्या आकस्मिक अपघाती निधनानंतर ३० वर्षे नेटाने, पूर्ण विचारांनी संसार करताना वारंवार उपयोगात आली.

व्हर्नाक्युलर फायनलपर्यंतचे शिक्षण घेतल्यानंतर रतनने काही काळ शिक्षिकेची नोकरी केली. हस्तकलेतही निपुण असलेली रतन आईबरोबर बाळंतविडा करून देण्यासाठी गिरगावात एका दुकानातही जात असे.

त्यानंतर १९३७ साली रतनचे १६ डिसेंबरला आमच्या आजोबांबरोबर म्हणजेच श्री. विनायक गजानन अजिंक्य यांसोबत शुभमंगल झाले. आजोबा रेल्वेमध्ये नोकरीस होते. त्यांच्यासमवेत आजींनी संपूर्ण भारत पालथा घातला. आजोबांचे 'अजिंक्य फेस पावडर मॅन्युफॅक्चरिंग ब्युरो' या नावाचे काळबादेवी येथे दुकान होते. १९२३ साली याची स्थापना झाली होती. इथे मेकअपसाठी लागणाऱ्या पावडरी तयार होत. १९३६ साली स्वदेशी चळवळीमध्येही आजोबा सक्रीय सहभागी होते. नंतर १९२७ मध्ये शिवाजी पार्क येथे त्यांनी 'अजिंक्य हाऊस' बांधले आणि आजींबरोबर त्यांचे १९३७ मध्ये लग्न झाले.

४०च्या दशकापर्यंत पुरुष कलाकारच स्त्रीपात्राच्या भूमिका वठवत असत. आजोबा या कलाकारांचा मेकअपदेखील करत असत. मात्र ४० नंतर स्त्रीपात्रांचे काम खुद्द स्त्रिया करू लागग्या. त्यामुळे रंगभूषेसाठी, वेषभूषेसाठी स्त्री रंगकर्मीची आवश्यकता भासू लागली. पतीची ही विवंचना आजींनी दूर केली आणि त्याकाळची बरीच नाटके, मराठी, गुजराती, मद्रासी, बंगाली या अनेक भाषांच्या रंगभूमीवर आजी स्त्री कलाकारांच्या रंगभूषाकार झाल्या. आपल्या पाठारे प्रभु समाजातील; किंबहुना भारतातील त्या पहिल्या स्त्री रंगभूषाकार ठरू शकतील.

आजींनी अनेक नामवंत नाटकात आपला मोलाचा सहभाग दिला आहे. हुंडा (१९५२, झेवियर्स कॉलेज), भावबंधन (१९५३, शहापूर, आसनगाव), मायेच्या मुली (१९५३, पाठारे प्रभु महिला समाज), एक होता म्हातारा (१९५३, अंबरनाथ), जयंत जुगारी (१९५२), मायेचे मोल (१९५२), कन्नड नाटके- दशावतार, क्षमा (१९५२), हुं उभो छुं (गुजराती १९५२) अशा अनेक नाटकांत, तसेच 'गोकुळचा चोर' या चित्रपटातही आजींनी स्त्रीपात्रे रंगविली आहेत.



त्याकाळचा पहिला चित्रपट 'राजा हरिश्चंद्र' यातही आजी आजोबानी काम केले असण्याची शक्यता आहे. कारण त्याची कुठेही नोंद नसली तरी त्यावेळेस दादासाहेब फाळकेंनी त्या चित्रपट निर्मितीनंतर कीचेन्स काढल्या होत्या व ती एक आजोबांजवळ होती.

आजींच्या या कार्याला घरी थोडासा विरोध झालाच. पण पतीच्या व्यवसायात त्याला गरज असताना ठामपणे उभी राहिलेली ही त्याची अर्धांगिनी होती. तिने शांतपणे या विरोधास तोंड दिले. आपले घर, एकत्र कुटुंब, पतीचा व्यवसाय, पाच अपत्ये या सर्वांना योग्य वेळ दिला. सुगरण म्हणूनही आप्तेष्टांत त्या प्रिय होत्या. त्यांच्या हातचे घेवर, म्हैसूरपाक, विविध प्रकारच्या पोळ्या, बर्फी, फराळ, परभी पाककृती यांची अजूनही आठवण काढली जाते.

१९६३ साली बद्रीकेदारनाथला गेले असताना आजींनी एक वेगळाच प्रसंग अनुभवला. देवदर्शनानंतर एका मौनी बाबांच्या पाया पडावयास ते गेले. त्यांनी पाया पडताक्षणीच मौनीबाबा मौन सोडून 'यात्रा सफल हुई, फौरन घर जाओ' म्हणत पळत सुटला आणि दिसेनासा झाला. घरी पोहोचताक्षणी २० वर्षांचा मुलगा अनिल खूप आजारी असल्याचे दिसले. पण अनिल आईला पाहून 'आई तू आलीस, आता मी बरा होईन' असे सांगून बराही झाला. नंतर कळले की डॉक्टरांनीही त्याची आशा सोडली होती. आजीना मौनीबाबाचा आशीर्वाद फळला.

१९६८च्या नोव्हेंबरमध्ये आजोबांचे अपघाती निधन झाले. शांत, धीरगंभीर स्वभावाच्या आजींनी त्यानंतर २८ वर्षे मुलांच्या साथीने आपला संसार नेटाने केला. योग्य निर्णय घेण्याची वृत्ती, टापटीपपणा, काटकसर असे कितीतरी गुण आजींच्या अंगी होते. त्याच्या ओरडण्यातही माया पुरेपूर जाणवत असे.

२००० ते २००३ मध्ये 'माझी सूनमुख' या नाटकातील 'जीजी' ही व्यक्तिरेखा, ८० वर्षे म्हातारीची ही भूमिका लोकप्रिय झाली. ती व्यक्तिरेखा साकारताना मला माझी आजी कमला मोतीराम नायक आणि माझ्या आजेसासूबाई रतन यांची सतत आठवण होत असे. त्यांचे हसणं, लाजणं, वावरणं, दिसणं हे जितकं हृदयात साठरून ठेवता येईल तेवढं ठेवत गेले आणि भूमिकेत ओतत गेले. त्या नाटकाने जे यश दिलं त्यात या दोन्ही आजींचा सहवास, आठवणी आणि आशीर्वाद भरलाय.

रतनआजी, तुम्ही अजूनही आमच्या मनात, हृदयात खोलवर रुतला आहात.

हॅपी बर्थ डे टू यू आज्जी!



## पाठारे प्रभु हौशी कलामंदिर

दरवर्षीप्रमाणे ऐन दिवाळीच्या मोक्यावर पाठारे प्रभु एकत्रित आले ते 'हौशी कला'च्या कार्यक्रमात. रंगशारदाला झालेल्या या कार्यक्रमात 'एका लग्नाचे घोस्ट' करण्यात आले. प्रमुख पाहुण्यांचे भाषण, स्मरणिका विक्री आणि नंतर निघणारी लॉटरी यामुळे या समारंभाची रंगत वाढली. श्री प्रकाश नायक यांच्या श्रमाचे साफल्य या यशस्वीतेत होते.

*

लेखांक १

# मनातलं

-सौ. उज्ज्वल र. ब्रह्मांडकर

*(कथा , कादंबऱ्या, कविता लिहिणाऱ्या सौ. उज्ज्वलताईंनी प्रभुतरुणासाठी 'मनातलं' गूज मोकळं केलं आहे. दर महिन्याला जाणून घेऊ या त्यांच्या 'मनातलं'* **-संपादक**)

नवीन वर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा. किती छान वाटतं अशा शुभेच्छा देताना आणि स्वीकारताना! आणि मग जिकडे बघावं तिकडे छान प्रसन्न वाटतं. नवीन वर्षाच्या सुरुवातीला अर्थातच संकल्प करणं आलंच! कुणी रोजनिशी लिहायचा संकल्प करतं, तर कुणी खर्च कमी करण्याचा. लेखक नवीन वर्षात जास्तीत जास्त लिहायचा संकल्प करतात, तर वाचक नवीन पुस्तकं जितकी जास्तीत जास्त वाचता येतील तितकी वाचण्याचा.

तसं तर नवीन वर्ष हिंदूंच्या आयुष्यात आणखी दोनदा येतं. एक गुढी पाडवा आणि दुसरा दिवाळीचा पाडवा म्हणजेच बलिप्रतिपदा. आपण त्या वर्षारंभांना एकमेकांना शुभेच्छाही देतो. मग आपण तेव्हा असे संकल्प का नाही करीत? खरं तर काहीच हरकत नाही. नाहीतरी संकल्प स्वत:पुरतेच असतात. स्वत:च करायचे नी स्वत:च मोडायचे. मला वाटतं, माणसाला सतत काहीतरी नवीन करावंसं वाटतं नी म्हणूनच वर्षारंभीचे संकल्प पूर्ण वर्षभर चालवायची कल्पना आपल्या मनाला भावत नाही. मन ही अशी चीज आहे की, संधी मिळाली रे मिळाली की ते नाविन्याच्या शोधात रमतं. म्हणूनच काही वर्षी आपण गेल्या वर्षीचा अपूर्ण राहिलेला संकल्प पूर्ण करण्याचा संकल्प करतानाच कोणतातरी नवीन संकल्प करतो. आणि नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे अतिशय उत्साहात हे संकल्प साजरे होतात. नंतर रोजच्या ऐवजी दोनतीन दिवसांचा आराम केला जातो. नंतर नंतर या संकल्प पालनामध्ये खूपच दिवसांची तफावत पडते आणि शेवटी लवकरच आपण संकल्प विसरूनही जातो किंवा कंटाळून तो पाळणं सोडून देतो.

आणि मित्रमंडळी याचं वेगवेगळं कारण सांगतात. कुणी म्हणतं, 'आजकाल मुंबईचं जीवन धकाधकीचं झालंय नं, की या गोष्टीला वेळच नाही."

कुणी म्हणतं, 'संकल्प मध्ये मध्ये तर पाळतोय नं? मग खूप झालं."

तर कुणी म्हणतं, 'कंटाळा आला बुवा तेच तेच करण्याचा."

वेळच नाही म्हणणाऱ्यांना बाकी सर्व गोष्टी करता येतात. कारण त्या आवडीच्या असतात किंवा अत्यावश्यक असतात. टी.व्ही. पुढे संध्याकाळपासून रात्रीपर्यंत बसण्याचा कंटाळा नाही येत. कारण डोळ्यांपुढून वेगवेगळे कार्यक्रम, वेगवेगळ्या बातम्या सरकत असतात. मित्रमंडळींशी खूप वेळ फोनवरून गप्पा मारण्यात वेळ गेला हे सर्वानाच मान्य असतं. पण तो वेळ फुकट गेला असं मात्र मला वाटत नाही. कारण त्या गप्पांमध्ये कधीतरी चविष्ट बातम्या समजतात किंवा स्वत:ची आत्मप्रौढी सांगत राहतो. ते नाहीच जमलं तर आपण कुणालातरी लंबेचवडे उपदेश करतो. पण दुसरा कुणी फोनवर तसं करतोय अशी नुसती शंका आली तरी आपण धूर्तपणे- 'कुणीतरी आलंय वाटतं. मी नंतर बोलेन हं तुझ्याशी- अच्छा!" असं म्हणून फोन ठेवून देतो.

असं असलं तरीही प्रत्येकजण संकल्प करतोच करतो. मग गुढीपाडवा, बलिप्रतिपदा अशावेळी वेगवेगळे संकल्प केले तर? नाविन्याची हौसही भागेल नी संकल्पसुद्धा पार पडतील.

असं असेल तर ही संकल्प करण्याची संकल्पना रोजच का करू नये? रोज एक नवीन गोष्ट करण्याचं ठरवायचं आणि तसं पारही पाडायचं. रोजच्या रोज नाविन्याचा अनुभव मिळवायचा. असं केलं तर रोजची सुरुवातही अत्यंत उत्साहात होईल. नी दिवसाच्या शेवटी तो संकल्प पार पाडण्याचं समाधान मिळेल. शिवाय प्रत्येक दिवशी एक एक चांगली गोष्ट पार पाडली जाईल.

मन उत्साही असलं तर वाईट विचारांना थाराच मिळणार नाही. नैराश्य वाट्यालाही येणार नाही. पुष्कळांना स्वत:ची दु:खं कुरवाळत बसण्याची सवय असते आणि मग 'आहे मनोहर तरी गमते उदास" अशी त्या व्यक्तीची अवस्था होते.

खरं सांगू? अशा व्यक्तीच्या थाऱ्यालाही उभं राहू नये असं वाटतं. त्या व्यक्तीच्या हातात अगदीच काही न करण्यासारखं असेल तर गोष्ट वेगळी. तरीही आपण पुष्कळदा बघतो की अगदी दुर्धर आजारानं ग्रासलेली एखादी व्यक्ती सतत आनंदात वावरते. घरादाराला आनंदी ठेवण्याचा प्रयत्न करते. तेव्हा आपण त्या व्यक्तीची मनोमन आणि प्रकटसुद्धा खूप प्रशंसा करतो. पण ते तेवढ्यापुरतेच. खरंतर आपण त्या व्यक्तीकडून खूप काही शिकण्यासारखं असतं. पण आपण तेवढ्यापुरती त्याची प्रशंसा करून गप्प बसतो. त्याच्यापेक्षा खूप प्रमाणात आपण बरे, धडधाकट आणि चांगल्या परिस्थितीत असूनही कधी कधी आयुष्यावर, आपल्या परिस्थितीवर खूप वैतागत राहतो. त्याऐवजी आपण सदैव प्रसन्न,आनंदी राहण्याचा प्रयत्न केला तर नजर टाकू तिथं प्रसन्न वातावरण भासेल.

आपण प्रसन्न असलो तर कितीही अडचणी किंवा संकटं आली तरी त्यावेळी आपण शांत राहू शकू. शांत राहण्याचे दुसरेही फायदे असतातच की! त्या अडचणींवर कोणते उपाय करू शकू ते लक्षात येतं. आपण ते उपाय करूनही संकट टळणार नसेल तरीही त्या संकटांवर मात करू पाहण्याचं किंवा ती संकटं झेलण्याचं बळ आपोआप प्राप्त होतं.तसं होत असेल तर किती चांगलं! नाही का?

मागे कुठंतरी वाचलं होतं की दोन्ही हात आणि एक पाय गमावलेली एक मुलगी चांगल्या पायाची बोटं आणि दोन्ही खुरट्या हातांना एक एक बोटासारखा नीट न वाढलेला अवयव यांच्या सहाय्याने तांदूळ निवडणे, आईला घरकामात मदत करणे, सुईत दोरा ओवणं आणि त्या सुईनं कपड्यावर टाके घालणं सहज लीलया करू शकते. तिचा फोटोही दाखवलेला होता. काहीजण पायानं लिहितात, चित्रं काढतात, पेंटिंग्ज करतात, . म्हणजे जगात असाध्य असं कोणतंही काम नाही. मग आपण निदान आपल्या कुटुंबीयांना, मित्र मंडळींना संकटात साथ देऊ शकतो. अपंग, कर्णबधीर, मूकबधीर, दृष्टीहीन असे कित्येक लोक जिद्दीनं काही ना काही कला, विद्या, कामं आत्मसात करताना दिसतात.तिथं तसाच एखादा त्यांचं आयुष्यच बदलून टाकणारा संकल्पच तर असतो.

पण खरंच असा एखादा किंवा अनेक संकल्प करण्याची गरज आहे का? म्हणजे संकल्प न करतासुद्धा आपण चांगली कामं करून आपल्याच मनाला आनंदी ठेवू शकतो की!

जर आपण प्रत्येक क्षणाला सकारात्मक पद्धतीनं सामोरं जायचं ठरवलं तर? कोणत्याही क्षणी आपल्यासमोर किंवा आपल्या कुटुंबीयांसमोर अथवा आपल्या मित्रमैत्रिणींसमोर उभे ठाकणाऱ्या आयुष्यातल्या कोणत्याही आव्हाना-ला समर्थपणे सामोरे गेलो तर? तेव्हा कोणताही संकल्प नसला तरीही काहीही अडणार नाही.

शक्य त्या प्रत्येक क्षणाला वेगळा संकल्प केला नी लगेचच पार पाडला तर?

किंवा कोणताही संकल्पच केला नाही तर? फुलणारी फुलं, रंगाची किरणं किंवा सुंदर गंध उधळणारी सुवासिक किंवा बिनसुवासिक फुलं, वाऱ्याची शीतल झुळूक, वाहणारं स्वच्छ निर्मळ पाणी, सोनेरी किरणं, आभाळातून पडणारं चांदण्याचं शुभ्र क्षीर किंवा पाऊस या सगळ्यांचा संकल्प एकच. तो म्हणजे- सजीव असणाऱ्या प्रत्येकाला आनंद, आनंद नी फक्त आनंदच देणं. हा संकल्प मुद्दाम ठरवून न केलेला नी कसोशीनं न चुकता असिधारा व्रतासारखा पार पडलेला.

आपणही मनात येईल तेव्हा मनात येतील ते विचार लिहून ठेवले, जमेल तेव्हा खर्च कमी केला, नवीन पुस्तकं मिळवून वाचण्याचा प्रयत्न केला, जमेल तेव्हा दुसऱ्यांना, कुटुंबीयांना, मित्रमंडळींना जमेल ती मदत केली आणि वर्षाच्या शेवटी या झालेल्या कामांची जंत्री केली तर ती नक्कीच खूपच जास्त आहे हे लक्षात येईल.

...आणि पुन्हा पुढच्या वर्षाची सुरुवात धडाकेबाज होईल.

*

## अभिनंदन

दिनांक २३ डिसेंबर रोजी 'सकाळ साप्ताहिक' तर्फे सुगरणीसाठी 'बिर्याणी की महाराणी' ही अनोखी स्पर्धा पार पडली. यामध्ये सुमारे ६७५ महिला सहभागी झाल्या होत्या. आंतरराष्ट्रीय कीर्तीचे पाककलातज्ज्ञ श्री. अमर राणे, डॉ. सीमा सोनीत, संध्या कामेगावकर व कमल कुलकर्णी यांनी परीक्षण केले. नॉनव्हेज गटात सौ. मनिला अनिल राव यांच्या चिकन बिर्याणीला दुसरा क्रमांक मिळाला. शनिवार, दिनांक २९ डिसेंबरच्या 'सकाळ' साप्ताहिकामध्ये सौ. मनिला राव यांची बिर्याणीची कृती त्यांच्या फोटोसकट छापून आली आहे. अभिनंदन.

*

## अभिनंदन

कु. वैजयंती विश्वास अजिंक्य हिने यावर्षीसुद्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य यांच्याद्वारे आयोजित १२वीपर्यंत असलेल्या 'आंतर शालेय शूटिंग' स्पर्धेत १० मीटर पिस्तूल शूटिंगच्या १९ वर्षांखालील मुलींच्या गटात, मुंबई शहर विभागात 'रौप्य पदक', त्या पाठोपाठ मुंबई झोनमध्ये 'रौप्यपदक व नंतर राज्यस्तरीय स्पर्धेत 'कास्य पदक' मिळविले. त्यामुळे तिची २७ नोव्हेंबर ते २ डिसेंबर २०१२ या कालावधीत राष्ट्रीय स्पर्धापूर्व प्रशिक्षण शिबिरासाठी निवड झाली. त्यानंतर ३ डिसेंबर ते ७ डिसेंबर २०१२ या कालावधीत बालेवाडी, पुणे येथेच झालेल्या 'स्कूल गेम्स फेडरेशन ऑफ इंडिया'ने आयोजित केलेल्या ५८व्या राष्ट्रीय शालेय शूटिंग स्पर्धेत सहभागी होऊन तिने महाराष्ट्र राज्याचे प्रतिनिधीत्व केले. या स्पर्धेत तिने ४०० पैकी ३४४ गुण मिळवून महाराष्ट्राच्या संघाला 'सुवर्ण पदक' मिळवून देण्यात मोलाची कामगिरी बजावली.

लागोपाठ २ वर्षे या राष्ट्रीय पातळीवरील स्पर्धेत लक्षणीय कामगिरी केल्याबद्दल ती शिकत असलेल्या रुईया महाविद्यालयाने तिला 'क्रीडाभूषण' पुरस्कार देऊन सन्मानित केले आहे. अभिनंदन.

*

## प्रभु तरुण आश्रयदाते

१) सौ. विमल व श्री. माधव नायक,
२) सौ. नलिनी व श्री. रविंद्र रामराव मानकर,
३) सौ. अनामिका बी. ए. एल.एल.बी.
४) कै. नटवर्य नारायण रामराव झावबा
५) कै. सॉ. मोतिराम विनायक जयकर
६) आद्य संपादक कै. विष्णु कृष्ण कोठारे
७) कै. रावसाहेब चंद्रकांत बालमुकुंद वेलकर
८) कै. सौ. सुशीला यशवंतराव कीर्तीकर
कै. सौ. सुशीला व श्री. मोरेश्वर वि. प्रधान
९) सौ. मीरा व श्री. रविंद्र नानूजी दळवी
१०) कै. सौ. शलाका (अरुणप्रभा) शैलकुमार श्रीकृष्णनाथ दळवी
११) कै. श्रीमती चंपुबाई आणि
कै. आनंदराव सुंदरजी धराधर
१२) कै. सौ. रोहिणी (रत्नप्रभा) श्रीकर राणे
१३) सौ. निलीमा व श्री. सूजन केशवराव राणे
१४) कै.श्रीमती रोझाबाई आणि कै. बाळाराम केरोबा नायक
१५) कै. शरद विनायक कीर्तिकर यांच्या स्मरणार्थ अनामिक
१६) कै. सॉ. दिलीप रघुनंदन कोठारे
१७) कै. श्रीमती कमलजा आनंदराव अजिंक्य
१८) कै. दिवाळीबाई व कै. डॉ. वामनराव आनंदराव विजयकर
१९) कै. विष्णुराज बाळाराम नायक
२०) ॲड. सदाशिव आनंदराव धुरंधर
२१) कु. कस्तूर मोठाबाई जयकर
२२) कै. कमलिनी रमाकांत प्रधान
२३) कै. नटवर्य शरद श्रीकृष्णनाथ गणपतराव दळवी
२४) आद्य मराठी लघुलिपीकार कै. भुजंगराव रामचंद्र मानकर
२५) कै. वामन मोरेश्वर प्रभाकर
२६) कै. चंद्रकांत नारायण विजयकर,
कै. कुंजविहारी वाय. जी. तळपदे,
कै. प्रविण चंद्रकांत नारायण, विजयकर,
कै. वैभव कुंजविहारी वाय. जी. तळपदे
यांच्या स्मरणार्थ एक हितचिंतक
२७) कै. डॉ. विद्याधर चंद्रकांत नारायण विजयकर यांच्या स्मरणार्थ हितचिंतक
२८) कै. पूर्णचंद्र केशरीनाथ राव व
कै. सौ. शीला पूर्णचंद्र राव यांच्या स्मरणार्थ
२९) डॉ. राम गोविंदराव नवलकर
३०) सौ. शुभांगी राम नवलकर
३१) सौ. रीटा आणि श्री. मंदार माधवराव नायक

## प्रभुतरुणास देणग्या

❁ श्री. सतीश, अनिल, माधुरी, रवी आणि प्रवीण याजकडून त्यांची आई श्रीमती रतन विनायक अजिंक्य यांच्या जन्मशताब्दीनिमित्ताने रु. ५०००/-

❁ सौ. नयना आणि श्री. राजेंद्र विनायकराव नवलकर याजकडून कै. श्रीमती सुनंदा व कै. श्री. यशवंतराव आनंदराव भाऊ नवलकर यांच्या स्मरणार्थ रु. १००१/-

❁ सौ. नयना आणि श्री. राजेंद्र विनायकराव नवलकर यांजकडून कै. श्रीमती कमल व कै. श्री. विनायकराव आनंदराव नवलकर यांच्या स्मरणार्थ रु. १००१/-

❁ श्रीमती कस्तुर रवींद्र तळपदे यांजकडून रु. १००१/-

❁ श्री. गोविंदराव भगवंतराव आगासकर यांच्या पुण्यस्मरणार्थ (पुण्यतिथी ३१ डिसेंबर) विलोभना, मृदुला आणि उज्ज्वला या त्यांच्या कन्यांकडून रु. १००१/-

❁ सौ. कामिनी गोविंदराव भगवंतराव आगासकर यांच्या पुण्यस्मरणार्थ (पुण्यतिथी १८ डिसेंबर) त्यांच्या कन्या विलोभना, मृदुला आणि उज्ज्वला यांजकडून रु. १००१/-

❁ श्री. उमेश कीर्तिकर आणि सौ. सुप्रिया कीर्तिकर यांजकडून प्रभुतरुणास दिवाळी भेट रु. १००१/-

❁ सौ. शोभा रविकुमार मुकुंद रणजित यांजकडून त्यांचे सुपुत्र श्री. धीरेन यांच्या विवाहाप्रीत्यर्थ रु. ५०१/-

❁ श्री. गजानन एस्. तळपदे यांजकडून त्यांचे मेहुणे श्री. सुरेश कमलाकांत जयकर यांच्या स्मरणार्थ रु. १५१/-

❁ श्री. नंदकिशोर मुकुंद कोठारे यांजकडून त्यांच्या मातोश्री श्रीमती सरोजिनी मुकुंद कोठारे यांच्या स्मरणार्थ रु. १०१/-

## पाठारे प्रभु खाद्य महोत्सव

यावर्षी पहिल्यांदाच ‘प्रभु प्रभात’बोर्डातर्फे परभी खाद्यमहोत्सव ३ आणि ४ नोव्हेंबररोजी खारच्या सांस्कृतिक सभागृहात साजरा करण्यात आला. उद्‌घाटक होते श्री. कुणाल विजयकर आणि सौ. जयश्री टी. या प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होत्या. आगळ्या वेगळ्या या खाद्यजत्रेला आपल्या परभू बंधुभगिनींनी उत्तम प्रतिसाद दिला.

## पाठारे प्रभु सोशल समाज

१ डिसेंबर २०१२ रोजी खारच्या सांस्कृतिक केंद्रात समाजाचे दिवाळी संमेलन थाटामाटात साजरे झाले. श्री. अजबसेन इंद्रसेन नवलकर हे प्रमुख पाहुणे होते. देवदिवाळीनंतर झालेल्या या संमेलनाचा आनंद दिवाळी-इतकाच मन भरून उसळणारा होता.

## अभिनंदन

महाराष्ट्र राज्य नाट्यस्पर्धेत उत्कृष्ट नेपथ्यासाठी श्री. अमर अनिल अजिंक्य यांना पुरस्कार प्राप्त झाला. अभिनंदन.

❁ १३ डिसेंबर २०१२ रोजी नवीवाडीतील माहेश्वरी देवीचा उत्सव सुरू झाला. व्यंकटेश मंदिरातून वाजतगाजत देवीची पालखी आणण्यात आली. २२ डिसेंबरपर्यंत चाललेल्या या देवी उत्सवात ज्ञातीयांनी मनोभावे देवीचे दर्शन घेतले.

## प्रभुतरुणास भाऊबीज

❁ सौ. जना रवींद्र नवलकर रु.१०१/-
❁ सौ. स्मिता अमोल रणजित रु.१०१/-
❁ सौ. अनिता अभिजित विजयकर रु.१०१/-
❁ श्रीमती कुमुद गजानन राणे रु.१०१/-

❁ श्री. जय के. देसाई यांजकडून वेबसाईटचे सदस्यत्व रु. १५१/-

# प्रभुतरुणाची डायरी

## नारळसाखर दिला

२७-१२-१२ श्री. राजस उल्हास राणे कु. कविता हरीश वाचकर

## नांदा सौख्यभरे

०७-११-१२ श्री अंकूर अरविंद राव
कु. श्वेता मिलिंद साखळकर (आंतरज्ञातीय)
२९-११-१२ श्री. धीरेन रविकुमार मुकुंद रणजित,
कु. मेधा विनायक आत्माराम राणे (आंतरज्ञातीय)
२२-१२-१२ श्री. जीतेन सुरेश नवलकर
कु. मिनौती शेखर चव्हाण (आंतरज्ञातीय)
२३-१२-१२ डॉ. विद्याधर सुनील दत्तात्रय आगासकर
कु. स्नेहा शिरीष पांडुरंग कोठारे

## विवाह हिरक महोत्सव (६० वर्षे)

०२-१२-१२ श्री. अंबर महादेव कोठारे
कु. सरोज माधवराव तळपदे

## विवाह सुवर्ण महोत्सव

०१-१२-१२ श्री. प्रभाकर मोरेश्वर कीर्तिकर
कु. विनोदिनी कमलाकांत जयकर
०२-१२-१२ श्री. शंकर गजानन त्रिलोकेकर
कु. किशोरी शंकर आनंदकर

(स्वरचित कविता, मंगलाष्टकांच्या गजरात हा महोत्सव मोठ्या थाटामाटात साजरा झाला. फोटोमधील जुना इतिहास उजळतांना दांपत्याला अनेकांनी शुभकामना दिल्या.)

## मरण

| | | | |
|---|---|---|---|
| ०२-१०-१२ | श्रीमती सरोजिनी मुकुंद कोठारे | वय ९२ | वसई |
| ०५-१०-१२ | श्रीमती सुनंदा चंद्रकांत प्रधान | वय ८४ | विलेपार्ले |
| ०७-१०-१२ | श्री. चंद्रकांत माणिकराव नवलकर | वय ९५ | फणसवाडी |
| २०-१०-१२ | श्री. सुरेश कमलाकांत जयकर | वय | गोरेगाव |
| १८-११-१२ | श्री. सिद्धकुमार गोविंदराव धराधर | वय ८३ | झावबावाडी |
| २०-११-१२ | श्री. रविकांत आनंदराव कोठारे | वय ८० | अंधेरी |
| २६-११-१२ | श्रीमती वसुंधरा शशिकांत धैर्यवान | वय ७६ | खार |
| २४-१२-१२ | श्री. चित्रसेन दत्ताराम अजिंक्य | वय ८६ | पुणे |
| ०९-०१-१३ | श्रीमती शाश्वती अश्विनीकुमार धुरंधर | वय ८३ | वांद्रे |

## अभिनंदन

भारतातील लठ्ठपणावरील वैद्यकीय चिकित्सेचे जन्मदाते म्हणून डॉ. विनोद धुरंधर यांना मानले जाते. बालरोगतज्ज्ञ म्हणून शिक्षण झालेल्या आणि स्वत: लठ्ठ असलेल्या त्यांनी, स्वत:चे वजन कमी करण्याचे प्रयोग प्रारंभी केले आणि नंतर मुंबईमध्ये लठ्ठपणावर उपचार करण्यासाठी केंद्र सुरू केले, ते ५० वर्षांपूर्वी! आता त्यांचे वय ८४ वर्षे असून All India Association for Advancement of Research in Obesity या ‘ना नफा’ तत्त्वावर चालणाऱ्या व्यावसायिक संघटनेचे ते संस्थापक अध्यक्ष आहेत. डॉ. विनोद धुरंधर यांचे पुत्र डॉ. निखिल धुरंधर यांनीही आहार या विषयात एम.एस. पदवी मिळवून लठ्ठपणा या विषयीचे काम सुरू केले. एक यशस्वी डॉक्टर म्हणून काम करत असताना डॉ. निखिल धुरंधर यांनी लठ्ठपणा या विषयावर विशेष संशोधन करून लठ्ठपणाच्या मूलभूत समस्येकडे लक्ष वेधले. डॉ. विनोद धुरंधर आणि डॉ. निखिल धुरंधर यांनी लिहिलेल्या ‘वजन घटविणे: एक सापशिडीचा खेळ’ या पुस्तकाचे ९ जानेवारी रोजी प्रकाशन झाले. ‘वजन वाढविणे हा शाप नाही की पूर्वजन्मीचे पाप नाही. तर तो एक गंभीर स्वरूपाचा आजार असून इतर आजाराप्रमाणेच त्यावर योग्य उपाययोजना करणे गरजेचे असते.’ असा आश्वासक विचार देणाऱ्या या पुस्तकाचे संपादन वैशाली वैद्य यांनी केले आहे. अनेक उदाहरणे आणि आकडेवारीच्या सहाय्याने अतिशय सोप्या भाषेत डॉक्टरांनी या विषयाचा ऊहापोह केला आहे.

सुप्रसिद्ध अभिनेता आमीर खान यांनी ‘गजनी’ चित्रपटाच्या वेळी आणि त्यानंतरही आपला आहार आणि वजन नियंत्रण यासाठी डॉ. धुरंधरांचा सल्ला घेतला होता. त्याला त्याचा भरपूर फायदा झाला. आपले अनुभव इतर वाचकांना सांगावेत या हेतूने आमीर खान यांनी या पुस्तकाला प्रस्तावना लिहिली आहे. ‘पॉप्युलर प्रकाशन’ तर्फे प्रसिद्ध झालेल्या त्यांच्या पुस्तकास शुभेच्छा आणि त्यांचे अभिनंदन.

हे मासिक मुद्रक, प्रकाशक श्रीमती सुहासिनी कीर्तिकर यांनी मालक बोर्ड ऑफ कंट्रोल प्रभुतरुण करिता मे. स्नेहेश प्रिंटर्स, ३२०-अ, शाह अँड नाहर इंडस्ट्रीयल इस्टेट, अ-१, धनराज मिल कंपाऊंड, सीताराम जाधव मार्ग, लोअर परेल, मुंबई-४०००१३ येथे छापून पारिजात बी-३, युनियन बँक एम्प्लॉईज को-ऑप. हौ. सोसायटी, पटेल इस्टेट, जोगेश्वरी (प.), मुंबई-४००१०२ येथे प्रकाशित केले.

संपादक: श्रीमती सुहासिनी कीर्तिकर

RNI NO. 14613/67